# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./३२५४/२०२२ दि.२९/०८/२०२२

## परिपत्रक

विषय:- विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून विद्यापीठाची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमास/अनधिकृत संस्थेत प्रवेश घेण्यापुर्वी विद्यापीठाकडून/सहसंचालक कार्यालयाकडून संस्थेबाबत खात्री करुन घेणेबाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक:संकीर्ण/(९९/२२)/ विशि-१/१०७९२ दि. १९/०८/२०२२

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व सर्व संबंधित विद्यार्थी व पालकांना सुचित करण्यात येते की, राज्यातील काही संस्थांमार्फत विद्यापीठ/युजीसी/एआयसीटीई ची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमांबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिराती देऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात व त्यांच्याकडून शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क आकारले जाते. अशा अनधिकृत संस्थांमध्ये/अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतल्याने विद्यार्थ्यांची फसवणूक झालेल्या आहेत.

सबब विद्यार्थ्यांनी फसवणूक होऊ नये म्हणून विद्यापीठ/युजीसी/एआयसीटीई ची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमात/अनधिकृत संस्थेत प्रवेश घेण्यापुर्वी विद्यार्थी/पालकांनी अशा संस्थाबाबत/अभ्यासक्रमाबाबत विद्यापीठाकडून/सहसंचालक कार्यालयाकडून सदर संस्थेबाबत/अभ्यासक्रमाबाबत खात्री करुन घ्यावी. जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्याची फसवणूक होणार नाही.

सहपत्र:- संलग्नित

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

(देवेंद्र एम. झाडे)
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ......
जावक क्र. 912 दि. 19/8/22

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२१११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

क्रमांक :संकीर्ण/(९९/२२)/विशि-१/ १०७९२ दि. 19 AUG 2022

प्रति,

कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक नागपूर
कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
कुलसचिव, अभिमत अनुदानित विद्यापीठे.
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 8529 दिनांक 19.8.22
जावक क्र. ........ दिनांक ........

विषय विद्यार्थ्याची फसवणूक होऊ नये म्हणून विद्यापीठाची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमास/अनधिकृत संस्थेत प्रवेश घेण्यापुर्वी विद्यापीठाकडून /सहसंचालक कार्यालयाकडून संस्थेबाबत खात्री करुन घेणेबाबत

संदर्भ शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१८६/विशि-३ दि.१४ जुलै,२०२२

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे या संचालनालयास पाठविलेले व आपणास पृष्ठांकित केलेले संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे, कृपया अवलोकनी घ्यावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राज्यातील काही संस्थांमार्फत विद्यापीठ/युजीसी/एआयसीटीईची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमाबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिराती देऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात व त्यांच्याकडून शैक्षणिक व इतर शुल्क आकारले जाते. तसेच अशा अनधिकृत संस्थांमध्ये/अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतल्याने विद्यार्थ्यांची फसवणूक झालेल्या आहेत.

सबब, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१३/प्र.क्र.२३२/तांशि-४ दि.०७.११.२०१३ व्दारे अधिसूचित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी, विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमास /अनधिकृत संस्थेस प्रवेश घेण्यापुर्वी विद्यापीठाकडून/सहसंचालक कार्यालयाकडून सदर संस्थेबाबत खात्री करुन घेण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करावी.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.श्री.अ.म.बाविस्कर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१
Email ID:- vishi3-hted@mah.gov.in
hted.vishi3-mh@gov.in

क्रमांक:-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१८६/विशि-३ दिनांक:- १४ जुलै, २०२२.

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

विषयः- विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून विद्यापीठाची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमास/ अनधिकृत संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाकडून/सहसंचालक कार्यालयाकडून संस्थेबाबत खात्री करुन घेण्याबाबत.

संदर्भः- (१) महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्र.टीईएम.२०१३/प्र.क्र.२३२/ तांशि-४, दि.०७/११/२०१३.

महोदय,

राज्यातील काही संस्थांमार्फत विद्यापीठ/ युजीसी/ एआयसीटीईची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमाबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिराती देऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात व त्यांच्याकडून शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क आकारले जाते. अशा अनधिकृत संस्थांमध्ये/ अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सबब, उपरोक्त संदर्भाधीन क्र. (२) येथील अधिसूचनेव्दारे अधिसूचित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी, विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून विद्यापीठ/ युजीसी/ एआयसीटीईची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमास/ अनधिकृत संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाकडून/ सहसंचालक कार्यालयाकडून सदर संस्थेबाबत खात्री करुन घेण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन सर्व संबंधितांना द्याव्यात.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे

२. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे
३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
४. कुलसचिव, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
५. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
६. विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, (सर्व)
७. विभागीय सह संचालक, तंत्र शिक्षण, (सर्व)
८. निवडनस्ती (विशि-३).